# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०१/२०२५ (गुरूवार) दुपार**

---

## शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोस्टे बेला:–** दिनांक १५/०१/२०२५ चे १३.५० वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्री पंकज प्रकाशराव होनाडे यय ४९ वर्ष, रा. उमरेड जि. नागपूर (पद– उपकार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. मर्यादीत कंपनी कार्यालय उमरेड) हे उपकार्यकारी अभियंता या पदावर असून म.रा.वि.वि.मर्यादीत कंपनी कार्यालय उमरेड येथे कार्यरत आहे. दि. १५/०१/२०२५ रोजी दुपारी ०१/५० वा. सुमारास फिर्यादी सोबत श्री जितेंद्र कूभारे सहायक अभियंता, राम गौरकर कनिष्ठ अभियंता, श्री परमानंद रामटेके सहायक अभियंतां, श्री रत्नाकर गोतमारे मूख्य तंत्रज्ञ, श्री सचिन साबळे प्रधान तंत्रज्ञ, श्री उमेश गूरपूडे तत्रज्ञ यांचे सह विज चोरी पकडणे मोहीम करीता मौजा पिपरा गावात जाउन मिलिंद बडिये रा पिपरा यांच्या पिपरा बसस्टॉप येथील हॉटेलमध्ये जाउन त्यांचे ईलेक्ट्रीक मिटर चेक करायला गेले असता तेथे त्याचा मूलगा शूभम बढीये रा पिपरा हा हजर होता त्याला सर्व स्टाफचा परीचय देउन त्यांच्या हॉटेलमधील ईलेक्ट्रीक मीटर दाखवण्यास सांगितले यावरून त्याने त्यांचा हॉटेलमधील ईलेक्ट्रीक मीटर दाखविले यावरून फिर्यादीने सदर मीटरची पाहणी केली व सदर मीटरचे ईलेक्ट्रीक बील मागणी केली असता शूभम बढीये याने ईलेक्ट्रीक बील आणून दिले सदर बीलचे पाहणी करून सदर बील मधील वापरलेली रिडींगची व मीटर वरील रिडींग ची पाहणी केली त्यानंतर सदर मिटर ज्यांचे नावावर त्यांना बोलवा असे फिर्यादीने शुभम बढीये यांना सांगितले यावरून शुभम बढीये यांनी त्यांचे वडील मिलिंद बढीये यांना फोन करून बोलाविलें त्यावरून मिलींद बढीये रा पिपरा हे त्यांच्या हॉटेलमध्ये हजर आले व त्यांनी फिर्यादीला तूमचे, आयकार्ड दाखवा असे सांगितले यावरून सर्व स्टाफनी त्याला आयकार्ड दाखविले त्यानंतर मिलिंद बढीये याने फिर्यादी व त्यांचा स्टाफ यांना अश्लिल शिवीगाळ केली व हॉटेलच्या बाहेर निघा अशी धमकी देउन शासकीय कामात अडथळा केले व सदर मिटर व ईलेक्ट्रीक बीलाचे त्याने पडताळणी करू दिली नाही व मिलिंद बढीये यांनी लोखंडी तलवार हातात घेउन फिर्यादीचे अंगावर मारायला धावून आला व जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून **आरोपी मिलिंद गुलाबराव बढीये वय ५३ वर्ष रा पिपरा त.उमरेड जि. नागपूर** याचेविरूद्ध पोस्टे बेला येथे कलम १३२, २९६, ३५१(३) भा.न्या.स २०२३. सहकलम ४/२५ आर्म ॲक्ट १९५९ सहकलम १३५ म. पो. का अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## प्राणांतिक अपघात

**पोस्टे काटोल:—** दिनांक १४/०१/२०२५ चे २२.०० वा. ते २२.२० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— रितीक व्यकंटेया दोहोलिया वय २१ वर्ष रा. श्रीराम नगर पंचवटी काटोल ता काटोल यांचे वडिल मृतक नामे— व्यंकटेश रामकिशन दोहलिया वय ५० वर्ष रा श्रीराम नगर पंचवटी काटोल हे लक्ष्मी मंगल कार्यालय काटोल येथील मृतकाच्या मोटार सायकल क्र एम एच ४० १३६० हया मोटारसायकलला मोसा क्र एम एच ४९ ए एक्स ७५८१ चे चालकाने भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवून मृतकाचे मोटरसायकलला जोरदार धडक दिल्याने मृतकाच्या डोक्याला गंभीर मार लागुन मरणास कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे काटोल येथे आरोपीविरूद्ध कलम २८१, १२५(सि), १०६(१), बी. एन.एस सहकलम १८४ मोटार वाहन अधि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध काटोल पोलीस घेत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर